**वाचले :-**

1) श्री.संजय धनपाल करिपुरे, रा.सामोडे (नवापुर रोड) ता.साक्री जि.धुळे यांचा उपविभागीय अधिकारी धुळे यांचे कडेस सादर केलेला अर्ज दिनांक 28/06/2005
2) अधिकारी धुळे यांचे पत्र क्रमांक गावठाण/कावि-850/2014 दिनांक 27 मार्च 2014
3) म.कार्यासन अधिकारी, महसूल व वनविभाग यांचे ज्ञापन क्र.जमीन-3214/प्र.क्र.203/ज-6 दि.26 ऑगस्ट 2014
4) मा.मंत्री (महसूल) महाराष्ट्र राज्य यांचे न्यायालयात प्रकरण क्रमांक जमीन 3214/प्र.क्र.203/ज-6 चे आदेश दिनांक 06 ऑक्टोबर 2015
5) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 चे कलम 50
6) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट) नियम 1971 मधील 41 , 43 (ब)
7) शासन निर्णय क्रमांक एलईएल-10/2001/प्र.क्र.225/ज-1 दिनांक 04.04.2002

---

क्रमांक महसूल शाखा (ब)/कक्ष-1/गावठाण/कावि-06 /2016
जिल्हाधिकारी कार्यालय धुळे
धुळे , दिनांक - 06 /01/2016

**आदेश,**

श्री.संजय धनपाल करिपुरे, रा.सामोडे (नवापुर रोड) ता.साक्री जि.धुळे यांनी उपोद्घातातील क्रमांक 1 अन्वये अतिक्रमण नियमानुकुल होणे बाबत विनंती केलेली आहे. त्यानुसार उपविभागीय अधिकारी धुळे यांचे उपोद्घातातील क्रमांक 2 च्या पत्रान्वये अतिक्रमणधारक यांचे मौजे सामोडे ता.साक्री जि.धुळे येथील गट नंबर 945 पैकी 100 x 65 = 6500 चौ.फूट जागेवरील सन 1971 **पासुन टायर रिमोल्डींगचा व्यवसाय या वाणिज्य प्रयोजनार्थ** केलेले अतिक्रमण नियमानुकूल करणेस हरकत नसल्याबाबत प्रस्ताव सादर केलेला होता. त्या अनुषंगाने इकडिल पत्र क्रमांक ब/कक्ष-1/गावठाण/कावि-164 दिनांक 01/07/2014 अन्वये म.विभागीय आयुक्त नाशिक यांचे कडेस पुढील कार्यवाहीस्तव प्रस्ताव सादर केला होता.

त्यानुसार म.कार्यासन अधिकारी, महसूल व वनविभाग यांचे कडिल ज्ञापन क्रमांक जमीन-3214/प्र.क्र.203/ज-6 दिनांक 26 ऑगस्ट 2014 अन्वये मौजे सामोडे ता.साक्री जिल्हा धुळे गट नंबर 945 या शासकिय जमिनीवरील 100 X 60 = 6000 चौ.फूट क्षेत्रावरील श्री.संजय करीपुरे यांचे वाणिज्य प्रयोजनासाठीचे (टायर रिमोल्डींगचा व्यवसाय) अतिक्रमण महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 चे कलम 50 व महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट) नियम 1971 मधील 43 (ब) तसेच शासन निर्णय क्रमांक एलईएल-10/2001/प्र.क्र.225/ज-1 दिनांक 04.04.2002 मधील तरतुदीनुसार अतिक्रमणाच्या दिवशीच्या जागेचे बाजार मुल्याच्या पाच पट इतकी दंडनिय रक्कम व त्यावर प्रचलित तरतुदीनुसार होणारे व्याज आकारुन नेहमीच्या अटी व शर्तीवर तसेच आदेशातील विशिष्ट अटीवर वाणिज्य प्रयोजनार्थ नियमित करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

त्यानुसार सह जिल्हा निबंधक , वर्ग-1 (निम्नश्रेणी) धुळे यांचे कडुन सदर जागेवर सन 1971 पासुनचे अतिक्रमणाबाबत सन 1971 सालातील विषयांकित जमीनीचे मुल्यांकन मागविले होते. त्यावर सह जिल्हा निबंधक वर्ग-1 (निम्नश्रेणी) धुळे यांचे पत्र क्रमांक कक्ष-7/मुल्यांकन/ 014/1733 दिनांक 08/09/2014 नुसार अहवाल सादर केला आहे की, " सदर प्रस्तावास सन 1971 चे मुल्यांकन अपेक्षिलेले आहे. परंतु सन 1971 या साली बाजारमुल्यदर अस्तित्वात नव्हते. बाजारमुल्य दर तक्ते सन 1989 साली प्रचलित करण्यात आलेले आहे. तथापि सन 1971 चे मुल्यांकन देता येणार नाही. परंतु मा.सहसंचालक , नगररचना मुल्यांकन, पुणे यांच्या दिनांक 03 ऑक्टोबर 1989 च्या परीपत्रकानुसार सन 1989 च्या दरावरुन सन 1981 चे दर निश्चित करण्यात येईल. त्यानुसार सन 1981 चे मौजे सामोडे ता.साक्री या गावाचे गट नंबर 945 चे क्षेत्र 100 X 60 = 6000 चौ.फूट बखळ जागेचे मुल्यांकन रु.8030/- (अक्षरी रु.आठ हजार तीस मात्र) निश्चित करण्यात येत आहे. "

परंतु प्रस्तुत प्रकरणी अतिक्रमणाच्या दिवशीचे (सन 1971) बाजार मुल्याबाबत माहिती उपलब्ध नसल्याने इकडिल पत्र क्र.ब/कक्ष-1/ गावठाण/ कावि-477/2014 दिनांक 17 ऑक्टोबर 2014 नुसार किंमत आकारणी कशी करावी ? याबाबत मार्गदर्शन मागविणे कामी म.कार्यासन अधिकारी, महसूल व वनविभाग म.कार्यासन अधिकारी.महसूल व वनविभाग (ज-6), मुंबई यांचे कडेस, (ज-6) , मंत्रालय मुंबई यांचे कडेस प्रस्ताव सादर केलेला आहे. तद्नंतर शासन स्तरावर प्रस्ताव प्रलंबित असल्याने अतिक्रमणधारक श्री.संजय धनपाल करीपुरे, रा.सामोडे ता.साक्री जि.धुळे यांनी मा.मंत्री (महसूल), महाराष्ट्र राज्य यांचे कडेस दिनांक 24/03/2015 रोजी लेखी अर्ज करुन प्रकरणात तातडीने निर्णय घेण्याबाबत विनंती केलेली आहे.

त्यानुसार प्रस्तुत प्रकरणी दिनांक 8 जुलै 2015 रोजी मा.मंत्री (महसूल) महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे न्यायालय, सुनावणीसाठी संबधीत अधिकारी यांना उपस्थित रहाणे बाबत कळविल्याने इकडिल पत्र क्रमांक ब/कक्ष-1/गावठाण/कावि-573 दिनांक 06/07/2015 च्या निर्देशानुसार सदर सुनावणीस उपविभागीय अधिकारी धुळे उपस्थित होते.तद्नंतर मा.मंत्री (महसूल) महाराष्ट्र राज्य यांचे न्यायालयात प्रकरण क्रमांक जमीन 3214/ प्र.क्र.203/ ज-6 दिनांक 06 ऑक्टोबर 2015 अन्वये खालील प्रमाणे आदेश पारीत केलेला आहे.

1) प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात येत आहे.
2) शासन ज्ञापन,महसूल व वनविभाग,क्रमांक जमीन-3214 प्र.क्र.203/ज-6 दिनांक 26/08/2014 मधील तरतुदीन्वये सन 1981 मधील मुल्यांकनानुसार दंडनिय रक्कम व त्यावर प्रचलित तरतुदीनुसार होणारे व्याज आकारुन अर्जदारांचे हक्क कायम करण्यास शासन मंजुरी देण्यात येत आहे.
3) प्रस्तुत निर्णय संबंधीतांना कळवावा.

सदर आदेशानुसार खालील प्रमाणे परीगणना करण्यात आलेली आहे.

**अतिक्रमण दंड आकारणी - तक्ता अ**

| गट नंबर | अतिक्रमित क्षेत्र | अतिक्रमणाचे स्वरुप | अतिक्रमणाचा कालावधी पासुन | अतिक्रमणाचा कालावधी पर्यंत | ज्या दिवशी अतिक्रमण केलेले आहे त्या दिवसाचे बाजार मुल्य, प्रती चौ.मी | रकाना क्रमांक 5 नुसार येणार दंडनीय कब्जा हक्काची रक्कम (रकाना 2 x 5) | रकाना क्रमांक 6 नुसार येणाऱ्या रक्कमेच्या पाचपट दंड रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 अ | 4 ब | 5 | 6 | 7 |
| मौजे सामोडे ता.साक्री गट नंबर 945 | 100 x 60 = 6000 चौ.फुट = 557.62 चौ.मी. | वाणिज्य (टायर रिमोल्डींगचा व्यवसाय) | 1971 | 2014 | 14.40 | 8030 | *40150* |

**अतिक्रमण दंड आकारणी - तक्ता ब**

| प्राईम लेंडींग रेटनुसार अतिक्रमणाच्या कालावधीचो विभागणी पासुन | पर्यंत | तक्ता अ मधील रकाना क्रमांक 7 नुसार आलेली दंडनीय रक्कम | प्राईम लेंडींग रेटनुसार असलेला व्याजदर (टक्केवारी) | व्याजाची रक्कम (रकाना क्रमांक 2 व रकाना क्रमांक 3 मधील टक्केवारी नुसार) | रकाना क्रमांक 1अ व 1ब नुसार विभागणी करुन येणारे एकुण वर्ष | एकुण व्याज रक्कम (रकाना क्रमांक 4 X 5) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 अ | 1 ब | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 01/01/1970 | 31/12/1977 | 40150 | 6.50 | 2610 | 08 | 20878 |
| 01/01/1978 | 31/12/1991 | 40150 | 8.00 | 3212 | 14 | 44968 |
| 01/01/1992 | 31/12/1998 | 40150 | 15.00 | 6023 | 07 | 42158 |
| 01/01/1999 | 31/12/1999 | 40150 | 13.00 | 5220 | 01 | 5220 |
| 01/01/2000 | 31/12/2000 | 40150 | 12.00 | 4818 | 01 | 4818 |
| 01/01/2001 | 31/12/2001 | 40150 | 15.00 | 6023 | 01 | 6023 |
| 01/01/2002 | 31/12/2002 | 40150 | 11.50 | 4617 | 01 | 4617 |
| 01/01/2003 | 31/12/2003 | 40150 | 10.75 | 4316 | 01 | 4316 |
| 01/01/2004 | 31/12/2006 | 40150 | 10.25 | 4115 | 03 | 12346 |
| 01/01/2007 | 31/12/2007 | 40150 | 11.50 | 4617 | 01 | 4617 |
| 01/01/2008 | 31/12/2008 | 40150 | 12.75 | 5119 | 01 | 5119 |
| 01/01/2009 | 31/12/2009 | 40150 | 12.75 | 4918 | 01 | 4918 |
| 01/01/2010 | 31/12/2010 | 40150 | 11.75 | 4718 | 01 | 4718 |
| 01/01/2011 | 31/12/2011 | 40150 | 12.50 | 5019 | 01 | 5019 |
| 01/01/2012 | 31/12/2013 | 40150 | 14.75 | 5922 | 02 | 11844 |
| 01/01/2014 | 31/12/2015 | 40150 | 10.00 | 4015 | 02 | 8030 |
| | | | | | एकुण | 189809 |

(अ) एकुण अतिक्रमण दंडात्मक रक्कम

| तक्ता अ मधील रकाना क्रमांक 7 ची पाचपट दंडात्मक रक्कम | तक्ता ब मधील रकाना क्रमांक 6 ची व्याजाची एकुण रक्कम | एकुण अतिक्रमण दंडात्मक रक्कम ( रकाना क्रमांक 1+2) |
|---|---|---|
| 40150 | 189809 | 2,29,959/- |

(क) दंडनीय बिनशेती सारा

| अतिक्रमित क्षेत्र | गावाचा बिनशेती दर | महसूल अकृषिक सारा (रकाना क्र. 1 x 2) | जिल्हा परीषद कर (रकाना क्र. 3 च्या सातपट) | ग्रामपंचायत उपकर ( रकाना क्र. 3 च्या एकपट) | एक वर्षाचा अकृषिक सारा (रकाना क्र.3+ 4 + 5) | अतिक्रमण कालावधी/ वर्ष | एकुण अकृषिक सारा (रकाना क्र. 5 x 6) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 557.62 चौ.मी. | 0.10 | 560 | 392 | 56 | 504 | 45 | 22680 |

(क) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 50 (2) नुसार दंडाची रक्कम = 2000/-

❖ **सन 1970 ते 2015 या कालावधीची खालील एकुण दंडात्मक रक्कम**

| एकुण अतिक्रमण दंडात्मक रक्कम (अ) | दंडनीय बिनशेती सारा (ब) | महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 50 (2) नुसार दंडाची रक्कम (क) | अतिक्रमणधारकाकडुन वसुल करावयाची दंडात्मक वसुली रक्कम (रकाना क्रमांक 1+2+3) |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 229959 | 22680 | 2000 | 2,54,639/- |

दंडात्मक वसुली रक्कम रु.2,54,639/- अक्षरी दोन लाख चोपन्न हजार सहाशे एकोणचाळीस मात्र

त्याअनुषंगाने इकडिल पत्र क्रमांक ब/कक्ष-1/गावठाण/कावि-777 दिनांक 17/11/2015 अन्वये श्री.संजय धनपाल करिपुरे रा.सामोडे ता.साक्री जि.धुळे यांना अतिक्रमण दंडात्मक वसुली रक्कम रु.2,54,639/- मात्र तहसिलदार साक्री यांचे मार्फत चलनाने शासन करणे बाबत कळविले आहे. त्यानुसार तहसिलदार कार्यालय साक्री यांचे कडिल पत्र क्रमांक गावठाण/कावि-1149/2015 दिनांक 28/12/2015 अन्वये अतिक्रमणधारक यांनी सदर रक्कम चलनाद्वारे (चलन क्रमांक GRN MH 00 5972416 2015 16 M ) भरल्याची प्रत सादर केलेली आहे.

उक्त परिस्थितीवरुन मी जिल्हाधिकारी धुळे शासनाकडिल दिनांक 26/08/2014 रोजीचे मंजुरी आदेश व मा.मंत्री (महसुल) यांचे दिनांक 06/10/2015 रोजीचे अपील आदेशातील निर्णयानुसार याव्दारे श्री.संजय धनपाल करिपुरे रा.सामोडे ता.साक्री जि.धुळे यांचे कडुन मौजे सामोडे ता.साक्री.गट नंबर 945 पैकी 100 x 60 = **6000 चौ.फूट जागेवरील टायर रिमोल्डींगचा व्यवसाय या वाणिज्य प्रयोजनार्थ** केलेले अतिक्रमण महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीची विल्हेवाट) नियम 1971 चे नियम 43 मधील तरतूदीनुसार व नियम 41 मधील अटी व शर्ती तसेच खाली नमूद केलेल्या अटी/शर्तीवर नियमानुकुल करण्यास परवानगी देत आहे.

**अटी/शर्ती**

1) कार्यासन अधिकारी महसुल व वनविभाग यांचे ज्ञापन क्रमांक जमीन 3214/2010/प्र.क्र.203/ज-6 दिनांक 26 ऑगस्ट 2014 रोजीचा आदेश तसेच मा.मंत्री (महसूल) महाराष्ट्र राज्य यांचे न्यायालयात प्रकरण क्रमांक जमीन 3214/प्र.क्र.203/ज-6 दिनांक 06 ऑक्टोबर 2015 च्या आदेशातील सर्व अटी/शर्ती लागु राहतील.
2) अतिक्रमण धारक सदर जागा **भोगवटदार वर्ग-2** म्हणुन धारण करेल.
3) सदर जागेचा **वापर केवळ टायर रिमोल्डींगचा व्यवसाय या वाणिज्य प्रयोजनार्थ करण्यात यावा.** त्याव्यतिरीक्त अन्य प्रयोजनासाठी जागेचा वापर करता येणार नाही. तसेच केवळ टायर रिमोल्डींगचा व्यवसाय सुरु असेपर्यंत सदर जमीन अतिक्रमणधारकाच्या ताब्यात राहील.टायर रिमोल्डींगचा व्यवसाय बंद झाल्यानंतर सदर जमीन त्यावरील बांधकामासह शासन/जिल्हाधिकारी परत ताबा घेतील.
4) अतिक्रमण धारक यांनी टायर रिमोल्डींगचा व्यवसाय संदर्भात नियमानुसार विक्रीकर आयुक्त धुळे यांचे कडेस व्यवसाय/ सेवा कर नोंदणी करणे आवश्यक आहे.
5) सदर टायर रिमोल्डींगचा व्यवसाय मुळे जल/वायु प्रदुषण होणार नाही याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच सुरक्षित उपाययोजना करणे आवश्यक आहे.
6) अतिक्रमण धारक यांनी अतिक्रमित क्षेत्रावर टायर रिमोल्डींगचा व्यवसाय साठी जागेचा वापर संदर्भात अतिक्रमित क्षेत्राचा नगररचनाकार धुळे यांचे कडुन अभिन्यास (Layout) मंजुर करुन घेण्यात यावा. तसेच अतिक्रमित क्षेत्राची भुमी अभिलेख विभागाकडुन शासकिय शुल्क भरुन मोजणी करुन घ्यावी.
7) सदर जमीन किंवा जमीनीचा कोणताही भाग शासनाच्या पुर्वपरवानगी शिवाय विक्री/हस्तांतरण करता येणार नाही किंवा तारण/गहाण ठेवता येणार नाही.
8) सदर अतिक्रमीत जागेवर सक्षम प्राधिकरण/शासन/जिल्हाधिकारी यांचे पुर्वपरवानगी शिवाय कोणतेही नवीन बांधकाम किंवा नवीन प्रकल्प/योजना सुरु करता येणार नाही.

9) गावातील सार्वजनिक/शासकिय किंवा लोकहितोपयोगी प्रयोजनासाठी सदर जमीनीची आवश्यकता भासल्यास सदर जमीन अतिक्रमण धारक यांना शासनास कोणतीही भरपाई न देता विनामोबदला परत करावी लागेल.

10) दरवर्षी प्रचलित बिनशेती सा-याची रक्कम सरकार जमा करावी. सदरचा बिनशेतीसारा बदलण्यास पात्र राहील.

11) जमीनीतील सर्व खाणी व खनीज पदार्थ तसेच पाणी या वरील शासनाने राखून ठेवलेल्या अधिकारास अधिन राहून अतिक्रमण तात्पुरत्या स्वरुपात नियमानुकुल करण्यात येत आहे. तसेच शासनास, खाणकाम व जमीनीतील द्रव्ये शोधण्याच्या प्रयोजनार्थ महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील तरतूदी नुसार त्या ठिकाणी प्रवेश करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य असेल.

12) महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग यांचे कडिल परीपत्रक क्रमांक जमीन-05/2007/प्र.क्र.32/ज-1 दिनांक 28 जुन 2007 मध्ये नमुद केल्यानुसार मंजुर करण्यात आलेल्या क्षेत्राच्या किमान 10 % क्षेत्रावर वृक्ष लागवड करुन त्यांची जोपासना करणे बंधनकारक राहील.

13) भविष्यात अतिक्रमण नियमानुकुल रक्कम परीगणना/ कब्जाहक्क रक्कम बाबत शासनाचे नविन आदेश/धोरण झाल्यास तसेच महालेखाकार यांचे लेखापरीक्षणात आक्षेप आल्यास त्यानुसार पुर्तता करणे अतिक्रमण धारक यांना बंधनकारक राहील.

14) सदर भुखंडातुन जात असलेल्या नाल्यावर स्लॅब ड्रेनजचे व सरंक्षक भिंतीचे बांधकाम करणे आवश्यक आहे.

15) अतिक्रमण धारक यांनी शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-05/2006/प्र.क्र.43/ज-1.दिनांक 31 ऑक्टोंबर 2006 अन्वये शासकीय जमीनी कब्जेहक्काने देतांना करावयाचा करारनामा दस्त मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 नुसार निष्पादित करणे बंधनकारक आहे. तसेच सदरच्या आदेशा पासून एक महिन्याच्या आत अतिक्रमण धारक यांनी तहसिलदार साक्री यांचे कडेस (सरकारी जमिनीचे विल्हेवाट) नियम 1971 मधील नियमानुसार विहीत नमून्यात करारपत्र/कबुलायत करुन देणे बंधनकारक राहील.

16) शासनाच्या तसेच सदर आदेशातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत अतिक्रमणधारक यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यावर तात्काळ तहसिलदार साक्री यांचे कडेस लेखी अभिप्रमाणित हमीपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

वरील पैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास किंवा प्रस्तुत कामी अतिक्रमणधारक यांनी पुरविलेली माहिती खोटी आढळल्यास सदर आदेश रद्द करण्यात येऊन सदर अतिक्रमित क्षेत्र सरकार जमा करण्यात येईल.

स्वाक्षरीत xxx
**जिल्हाधिकारी, धुळे**

प्रती :- श्री.संजय धनपाल करिपुरे रा.सामोडे ता.साक्री जि.धुळे यांचे कडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

प्रत :- म. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग (ज-6),पहिला मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय मुंबई -32 यांचेकडेस माहितीसाठी सादर.

प्रत :- म. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडेस माहितीसाठी सविनय सादर

प्रत :- विक्रीकर आयुक्त , विक्रीकर भवन , धुळे यांचे कडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद धुळे यांचे कडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

प्रत :- प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ नाशिक, उद्योग भवन,पहिला मजला,त्र्यंबक रोड, आयटीआय शेजारी, सातपुर , नाशिक -422007 यांचे कडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

प्रत :- जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, धुळे यांचेकडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

प्रत :- उपविभागीय अधिकारी धुळे कडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

प्रत :- तहसिलदार साक्री यांचेकडेस मुळ प्रस्ताव पृ.क्र. 1 ते सह पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

2/- अतिक्रमित क्षेत्राबर टायर रिमोल्डींगचा व्यवसाय साठी जागेचा वापर संदर्भात नगररचनाकार धुळे यांचे कडिल मंजुर अभिन्यास (Layout) तसेच अतिक्रमित क्षेत्राच्या भुमी अभिलेख विभागाकडिल मोजणी नकाशात लाल शाईने अधोरेखित केलेले/दर्शविलेले क्षेत्रानुसारच अतिक्रमणधारक यांना ताबा देण्यात यावा. तसेच अतिक्रमणधारक यांचे कडुन विहित मुदतीत कबुलायत/करारनामा करण्यात येऊन दप्तरी व कब्जाहक्क नोंदवही मध्ये आवश्यक ती नोंद करण्यात येऊन आदेशातील अटी व शर्तीची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

प्रत :- सरपंच, ग्रामपंचायत सामोडे ता.साक्री जि.धुळे यांचे कडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

**उपजिल्हाधिकारी (प्रशासन)**
**जिल्हाधिकारी धुळे करिता**

C:\०१ GAOTHAN\०१ Grant of Land\०४ Shindkheda\Malich.docx

वाचले :-

1. उपविभागीय अधिकारी शिरपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-1/गावठाण/काวि-45 दिनांक 20/02/2016
2. महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग पत्र क्रमांक जमीन-01/2008/प्र.क्र.175/ज-1 दिनांक 09 फेब्रवारी 2010
3. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.धुळे यांचे आर्थिक मान्यता आदेश जा.क्र.ग्रापापु/लेशा/आमाशा/1155 दिनांक 14/07/2014
4. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चा नियम 22
5. महाराष्ट्रजमीनमहसूल (सरकारी जमीनीची विल्हेवाट लावणे)नियम 1971चा नियम 6 (अ)
6. महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र.जमीन 03/2011/प्र.क्र.53/ज-1,दिनांक 12 जुलै 2011

---

क्रमांक महसूल शाखा (ब)/कक्ष-1/गावठाण/कावि-129/2016
जिल्हाधिकारी कार्यालय धुळे
धुळे , दिनांक - 11/03/2016

**आदेश**

ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी शिरपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-1/गावठाण/कावि-45 दिनांक 20/02/2016 अन्वये ग्रामपंचायत माळीच यांना पाणी पुरवठा योजनेच्या विहिरीसाठी मौजे माळीच ता.शिंदखेडा येथील गुरचरण गट नंबर 30 मधील 4 हेक्टर 96 आर क्षेत्रापैकी 01 आर क्षेत्र मंजुरी बाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.धुळे यांचे आर्थिक मान्यता आदेश जा.क्र.जिपधु/ग्रापापु/लेशा/आमाशा/1155 दिनांक 14/07/2014 अन्वये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत कृती आराखडा सन 2014-15 मध्ये प्रस्तावित नळ पाणी पुरवठा योजना/ पुरक पाणी पुरवठा योजनेच्या अंदाजपत्रकास रक्कम रु.20,17,064/- (अक्षरी वीस लाख सतरा हजार चौसष्ट मात्र) ला तांत्रिक व प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्यात आली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.धुळे यांनी त्यांचे पत्र क्रमांक ग्रापं/1/3/848 दिनांक 22/10/2015 अन्वये शासन निर्णय दिनांक 12 जुलै 2011 मधील सुचनांचा विचार करुन व ग्रामसभा माळीच यांचे ठराव क्रमांक 22 दिनांक 15/08/2014 चा विचार होऊन पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अहवाल सादर केला आहे.

कार्यकारी अभियंता,रो.ह.यो (सा.बां.) विभाग धुळे यांचे पत्र क्रमांक रोहयो/रेशा/2984 दिनांक 26/06/2015 अन्वये विषयांकित क्षेत्र हे पथकिनारवर्ती नियमानुसार (Ribon Development Control Rules) बांधकामास योग्य असल्याबाबत अहवाल सादर केलेला आहे.

उपविभागीय अधिकारी पाटबंधारे उपविभाग क्रमांक 1 धुळे यांचे पत्र क्रमांक बिनशेती/1488 दिनांक 08/09/2015 अन्वये विषयांकित क्षेत्र पाटशाखा चिमठाणे अंतर्गत असलेल्या कोणत्याही प्रकल्पाच्या लाभदायक किंवा बुडीत क्षेत्रात येत नसल्याबाबत अहवाल सादर केला आहे.

वरीष्ठ भुवैज्ञानिक ,भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा धुळे यांचे पत्र क्रमांक वभूवै/भूसविय/ता/891 दिनांक 20/10/2015 अन्वये सदर जागा पाणी पुरवठा विहिर घेण्यासाठी योग्य असल्याचा अहवाल सादर केलेला आहे.

सह जिल्हा निबंधक वर्ग-1 (निम्नश्रेणी) धुळे यांचे पत्र क्रमांक 49, दिनांक 07/01/2016 मौजे माळीच ता.शिंदखेडा येथील गट नंबर 30 मधील 1 आर (100 चौ.मी.) क्षेत्राचे मुल्यांकन रु.23,500/- अक्षरी तेवीस हजार पाचशे मात्र कळविले आहे.

मागणी केलेले क्षेत्र (01 आर) वजा जाता शिल्लक राहणारे गायरान क्षेत्र (9 हेक्टर 34) हे एकुण लागवडयोग्यक्षेत्र (451 हेक्टर 56) आर च्या 5 % पेक्षाकमी आहे.

महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र.जमीन 03/2011/प्र.क्र.53/ज-1, दिनांक 12 जुलै 2011 च्या मुद्दा क्रमांक 9 (1) नुसार राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणा-या सार्वजनिक सुविधा (Public Utility) व सार्वजनिक प्रयोजन (PublicPurpose) साठी अन्य जमीन उपलब्ध नसल्यास गायरान जमीनीचा वापराबाबत विचार करावा असे निर्देशित केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणी उपविभागीय अधिकारी शिरपूर यांचे अहवालानुसार माळीच गावाच्या लोकसंख्येच्या मानाने सद्याची पाणी पुरवठा व्यवस्था अपुर्ण पडत असुन पाणी टंचाई निवारणासाठी गुरचरण जमिनीची आवश्यकता असले बाबत नमुद केलेले आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीची विल्हेवाट लावणे) नियम 1971 चा नियम 6 (अ) अंतर्गत शासन अधिसुचना क्रमांक जमीन-08/2012/प्र.क्र.48/दिनांक 19 मे 2015 अन्वये मा.जिल्हाधिकारी सो. यांना रु.5,00,000/- पावेतोच्या जमीनीच्या मुल्यांकनानुसार इतर सार्वजनिक बांधकामे स्थानिक प्राधिकरणाच्या निधीतुन (भोगाधिकार मुल्यरहित व महसूल मुक्त किमतीवर) असलेल्या कामांना शासकिय जमीन मंजुर करावयाचे अधिकार आहेत.त्यानुसार प्रस्तुत प्रकरणी मागणी क्षेत्राचे मुल्यांकन सदर वित्तीय मर्यादेच्या आत रु.23,500/- आहे.

त्याअर्थी, मी जिल्हाधिकारी धुळे मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन,महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चा नियम 22 तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीची विल्हेवाट लावणे) नियम 1971 चा नियम 5 व 6 अन्वये मौजे मौजे माळीच ता.शिंदखेडा येथील गुरचरण गट नंबर 30 मधील उपअधीक्षक भुमि अभिलेख शिंदखेडा यांचे कडिल मो.र.नं./245,दिनांक 21/09/2015 मध्ये दर्शविलेले 01 **आर क्षेत्र** ग्रामपंचायत माळीच यांना सार्वजनिक पाणी पुरवठा योजना विहिर या प्रयोजनासाठी खालील अटी/शर्तीवर महसूलमुक्त व सारामाफीने प्रदान/मंजुर करीत आहे.

**अटी/शर्ती**

1) ग्रामपंचायत माळीच सदर मंजुर क्षेत्र **भोगवटदार वर्ग-2** म्हणुन धारण करतील.
2) सदर जमीनीचा मंजुर प्रयोजनार्थ अन्यकोणत्याही प्रयोजनासाठी वापर करता येणार नाही.
3) सदर जमीन किंवा जमीनीचा कोणताही भाग विक्री, हस्तांतरण करता येणार नाही किंवा तारण ठेवता येणार नाही.
4) सदर जागेसनियमानुसार आवश्यक रुंदीचा पोहच रस्ता तयार करण्यात यावा.
5) बांधकामाचा आराखडा/प्राकलन (Design) वरिष्ठ भुवैज्ञानिक ,भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा धुळे यांचे कडुन मंजुर करुन घेऊन भुजल विभागाच्या शिफारशीनुसार मोजणी नकाश्यातील मंजुर केलेल्या 01 आर क्षेत्रावर्रविहित व्यास व विहित खोलीची विहिर खोदावी तसेच दोन विहिरींमधील एकमेकांवरील इंटरफिअरन्स टाळण्यासाठी भुजल अधिनियमाप्रमाणे अंतर ठेवावे व सुरक्षिततेच्या दृष्टीने विहिरीचे पक्के बांधकाम करुन विहिरीच्या वरील पृष्ठभागावर संरक्षक जाळी बसवावी. तथापि, विहिरीच्या बांधकामामुळे नदीच्या किंवा ओढयाच्या नैसर्गिक प्रवाहाला बाधा येता कामा नये याची दक्षता घेण्यात यावी.
6) रस्त्याच्या मध्यापासुन नियंत्रण रेषेच्या आत कोणतेही बांधकाम करता येणार नाही तसेच जोड रस्ता किंवा संवारस्त्याची आवश्यकता असल्यास कार्यकारी अभियंता,रो.ह.यो.(सा.बां.) विभाग धुळे यांचे कडेस स्वतंत्रपणे प्रस्ताव सादर करणे बंधनकारक राहील.
7) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 व शासन नियमातील तरतुदीनुसार जमीनीतील सर्व खाणी व खनीज पदार्थ द्रव्य पदार्थ तसेच पाणी या वरील शासनाने राखून ठेवलेल्या अधिकारास अधिन राहून जमीन वर्ग करण्यात येत आहे.
8) महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग परीपत्रक क्र.जमीन-05/2007/प्र.क्र.32/ज-1 दि.28/06/2007 मध्ये नमुद केल्यानुसार मंजुर करण्यात आलेल्या क्षेत्राच्या किमान 10 % क्षेत्रावर वृक्ष लागवड करुन त्यांची जोपासना करणे बंधनकारक राहील.
9) सरपंच,ग्रामपंचायत माळीच ता.शिंदखेडा यांनीशासनपरिपत्रकक्र.संकीर्ण-05/2006/प्र.क्र.43/ज-1,दिनांक 31 ऑक्टोंबर 2006 अन्वयेशासकीयजमीनी कब्जेहक्काने देतांनाकरावयाचाकरारनामादस्तमुंबईमुद्रांकअधिनियम 1958 नुसार निष्पादित करणे बंधनकारक आहे. तसेच सदरच्याआदेशापासूनएकमहिन्याच्याआततहसिलदार शिंदखेडा यांचे कडेस (सरकारी जमिनीची विल्हेवाट) नियम 1971 व महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-4 ब अधिसुचना क्रमांक जमीन-2015/प्र.क्र.55/ज-1 दिनांक 31/12/2015 मधील विहित नमुन्यात सनद तयार करुन देणे बंधनकारक राहील.
10) वरील पैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न देता सदर जमीन सरकार जमा करण्यात येईल.

स्वाक्षरीत xxx
**जिल्हाधिकारीधुळे**

प्रति :- सरपंच, ग्रामपंचायत माळीच, ता.शिंदखेडा जि.धुळे यांचे कडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- म.विभागीयआयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे कडेस माहितीसाठी सविनय सादर
प्रत :- म.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धुळे यांचे कडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा योजना, जिल्हा परिषद धुळे यांचे कडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- वरीष्ठभुवैज्ञानिक ,भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा धुळे यांचे कडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- उपविभागीय अधिकारी शिरपूरकडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- तहसिलदार शिंदखेडा यांचे कडेस मुळ प्रस्ताव पृ.क्र. 1 ते /// सह पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

2/- सरपंच, ग्रामपंचायत माळीच, ता.शिंदखेडा जि.धुळे यांना सदर मंजुर क्षेत्राचा ताबा देण्यात येऊन त्यांचे कडुन विहित मुदतीत करारनामा व सनद करण्यात येऊन दप्तरी व कब्जाहक्क नोंदवही मध्ये आवश्यक ती नोंद करण्यात येऊन, आदेशातील अटी व शर्तीची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

**उपजिल्हाधिकारी(प्रशासन)**
**जिल्हाधिकारीधुळेकरिता**

C:\01 GAOTHAN\01 Grant of Land\01 Dhule\Nakane Hostel Tribal.docx

वाचले :-

1. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प धुळे यांचे पत्र क्रमांक- 4(3)/4594 दिनांक 28/11/2014
2. उपविभागीय अधिकारी धुळे यांचे पत्र क्रमांक गावठाण/कावि-3459 दिनांक 31/12/2015
3. महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग पत्र क्रमांक जमीन-01/2008/प्र.क्र.175/ज-1 दिनांक 09 फेब्रवारी 2010
4. महाराष्ट्र शासन अदिवासी विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक आवगृ-2009/प्र.क्र.32/का.12 दिनांक 04 मार्च 2010
5. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-4 ब अधिसुचना क्रमांक जमीन-2015/प्र.क्र.55/ज-1 दिनांक 31/12/2015

---

क्रमांक महसूल शाखा (ब)/कक्ष-1/गावठाण/कावि-21/2016
जिल्हाधिकारी कार्यालय धुळे
धुळे , दिनांक - 15/01/2016

**आदेश**

ज्या अर्थी , प्रकल्प अधिकारी, एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प धुळे यांचे पत्र क्रमांक- 4(3)/4594 दिनांक 28/11/2014 अन्वये मौजे नकाणे ता.जि.धुळे येथील गट नंबर 158/3 मध्ये आदिवासी मुलांचे वसतिगृहासाठी जागा मंजुर होणेस विनंती केलेली आहे.

त्याअनुषंगाने प्रकरणाची तहसिलदार धुळे यांचे मार्फत सविस्तर चौकशी करण्यात आलेली असुन, उपविभागीय अधिकारी धुळे यांचे पत्र क्रमांक गावठाण/कावि-3459 दिनांक 31/12/2015 अन्वये प्रस्तुत प्रकरणी मौजे नकाणे ता.जि.धुळे येथील 1 हेक्टर 49 आर क्षेत्र वितरीत करणेस हरकत नसले बाबत अहवाल सादर केलेला आहे.

महाराष्ट्र शासन अदिवासी विकास विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक आवगृ-2009/प्र.क्र.32/का.12 दिनांक 04 मार्च 2010 अन्वये शासकिय अदिवासी मुलांचे वसतीगृहासाठी विद्यार्थी क्षमता 125 Seats ( G + 2) नुसार प्रशासकिय मान्यता दिलेली आहे.

ग्रामसभा नकाणे यांचे कडिल ठराव क्रमांक 12/12 दिनांक 26/01/2015 नुसार दिलेल्या नाहरकत ठरावावर मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.धुळे यांचे पत्र क्रमांक 747 दिनांक 27/08/2015 नुसार पुढील कार्यवाहीस्तव अहवाल सादर केलेला आहे.

कार्यकारी अभियंता,सा.बा.विभाग धुळे यांचा दाखल क्रमांक 9524 दिनांक 10/12/2015 अन्वये मौजे नकाणे शिवारातील गट क्रमांक 158/3 या जागेकडे जाण्याकरीता धुळे नकाणे वार सुट्रेपाडा प्रजिमा-22 रस्त्यावरुन पोहच रस्ता आहे. सदर जागा प्रमुख जिल्हा मार्ग व नदी किना-यापासुन 500 ते 600 मी.अंतरावर असुन समतल असल्याने हि जागा पथकिनारवर्ती नियमानुसार बांधकाम करणेस योग्य आहे. असा अहवाल सादर केलेला आहे.

उपविभागीय अधिकारी पाटबंधारे उपविभाग क्रमांक 1 धुळे यांचे पत्र क्रमांक बिनशेती/11 दिनांक 04/01/2016 अन्वये मौजे नकाणे ता.जि.धुळे येथील गट नंबर 158/3 मधील शासकिय जमीन पाटशाखा धुळे-1 अंतर्गत असलेल्या कोणत्याही प्रकल्पाच्या लाभदायक किंवा बुडीत क्षेत्रात येत नसल्याबाबत अहवाल सादर केलेला आहे. तसेच मागणी क्षेत्र हे पांझरा नदी व लोंढा नाला लगत असुन नकाश्यात दाखविल्याप्रमाणे पुरनियंत्रण रेषेच्या वरती 0.60 मीटरने संरक्षीत भिंत बांधण्यात यावी असे कळविले आहे.

सह जिल्हा निबंधक वर्ग-1 (निम्नश्रेणी) धुळे यांचे पत्र क्रमांक कक्ष/मुल्यांकन/25 , दिनांक 06/01/2016 अन्वये मौजे नकाणे ता.जि.धुळे येथील गट नंबर 158/3 मधील एकुण 1 हेक्टर 49 आर क्षेत्राचे अकृषिक मुल्यांकन रु.42,75,000/- अक्षरी बेचाळीस लाख पंच्याहत्तर हजार मात्र कळविले आहे.

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प धुळे , यांचे पत्र क्रमांक शावगृ-2015/प्रक्र/का-4(3)/11 दिनांक 02/01/2016 अन्वये आदिवासी मुलांचे वसतिगृह या प्रयोजनासाठी जमिनीच्या किमान गरजेनुसार (Bonafide area requirement) क्षेत्र आवश्यक असले बाबत प्रमाणित केलेले आहे.

महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग यांचे कडिल शासन निर्णय क्रमांक जमीन-05/2011/प्र.क्र.90/ज-1 दिनांक 27 जुलै 2011 नुसार शासकिय आश्रमशाळा इत्यादी शासकिय प्रयोजनासाठी जमिनीच्या किमान गरजेनुसार (Bonafide area requirement) जिल्हाधिकारी यांना 1 हेक्टर पर्यंत क्षेत्राचा आगाऊ ताबा देण्याचे अधिकार आहेत. परंतु महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-4 ब अधिसुचना क्रमांक जमीन-2015/प्र.क्र.55/ज-1 दिनांक 31/12/2015 मधील कलम 3 (ब) नुसार, ज्या ठिकाणी राज्य शासनाने रितसर मान्यता प्रदान केलेल्या शासकिय प्रकल्पांकरीता शासकिय जमीन आवश्यक असल्, तेथे अशा जमिनीचे भोगवटामूल्य कितीही असेल तरी, जिल्हाधिकारी अशी जमीन राज्य शासनाच्या संबंधित विभागास महसूलमुक्त व सारामाफीने प्रदान करण्यास सक्षम राहतील, असे नमुद केलेले आहे.

त्याअर्थी, मी जिल्हाधिकारी धुळे मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन, महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीची विल्हेवाट लावणे) नियम 1971 चा नियम 5 व 6 अन्वये मौजे नकाणे ता.जि.धुळे येथील गाववर्दळ (सरकारी) गट नंबर 158/3 मधील एकुण क्षेत्र 7 हेक्टर 49 आर पैकी उपअधीक्षक भुमि अभिलेख धुळे यांचे कडिल मो.र.नं./धुळे/जमिन प्रदान/अ.ता./2,दिनांक 19/08/2015 मध्ये दर्शविलेले **01 हेक्टर 49 आर क्षेत्र** प्रकल्प अधिकारी, एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प धुळे यांना **आदिवासी मुलांचे वसतिगृह** या प्रयोजनासाठी खालील अटी/शर्तीवर महसूलमुक्त व सारामाफीने प्रदान/मंजुर करीत आहे.

**अटी/शर्ती**

1) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प धुळे हे सदर मंजुर क्षेत्र **भोगवटदार वर्ग 2** म्हणुन धारण करतील.
2) सदर जमीनीचा मंजुर प्रयोजनार्थ अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी वापर करता येणार नाही.
3) सदर जमीन किंवा जमीनीचा कोणताही भाग विक्री, हस्तांतरण करता येणार नाही किंवा तारण ठेवता येणार नाही.
4) सदर जागेस नियमानुसार आवश्यक रुंदीचा पोच रस्ता व सदर भुखंडातुन जात असलेल्या नाल्यावर स्लॅब ड्रेनचे बांधकाम करणे आवश्यक आहे. तसेच , जमीन समतल करुन घेण्यात यावी व मंजुर आराखडयाप्रमाणे बांधकाम करण्यात यावे.
5) उपविभागीय अधिकारी पाटबंधारे उपविभाग क्रमांक 1 धुळे यांचे निर्देशानुसार नकाश्यात दाखविल्याप्रमाणे पुरनियंत्रण रेषेच्या वरती 0.60 मीटरने संरक्षीत भिंत बांधणे आवश्यक आहे.
6) रस्त्याच्या मध्यापासुन 40.00 मीटर (वळण रस्त्याच्या बाबतीत 75.00 मीटर) नियंत्रण रेषेच्या आत संबंधीतास कोणतेही बांधकाम करता येणार नाही तसेच जोड रस्ता किंवा सेवा रस्त्याची आवश्यकता असल्यास कार्यकारी अभियंता.सार्वजनिक बांधकाम विभाग धुळे यांचे कडेस स्वतंत्रपणे प्रस्ताव सादर करणे बंधनकारक राहील.
7) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 व शासन नियमातील तरतुदीनुसार जमीनीतील सर्व खाणी व खनीज पदार्थ द्रव्य पदार्थ तसेच पाणी या वरील शासनाने राखून ठेवलेल्या अधिकारास अधिन राहून जमीन वर्ग करण्यात येत आहे.
8) महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग यांचे कडिल परीपत्रक क्रमांक जमीन-07/2013 प्र.क्र.374/ज-1 दिनांक 10/10/2013 नुसार सदर जमीनीच्या कोणत्याही क्षेत्रावर अतिक्रमण होणार नाही याबाबत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प धुळे यांची जबाबदारी राहील.
9) महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग परीपत्रक क्र.जमीन-05/2007/प्र.क्र.32/ज-1 दि.28/06/2007 मध्ये नमुद केल्यानुसार मंजुर करण्यात आलेल्या क्षेत्राच्या किमान 10 % क्षेत्रावर वृक्ष लागवड करुन त्यांची जोपासना करणे बंधनकारक राहील.
10) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-4 ब अधिसुचना क्रमांक जमीन-2015/प्र.क्र.55/ज-1 दिनांक 31/12/2015
11) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प धुळे यांनी शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-05/2006/प्र.क्र.43/ज-1,दिनांक 31 ऑक्टोबर 2006 अन्वये शासकीय जमीनी कब्जेहक्काने देतांना करावयाचा करारनामा दस्त मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 नुसार निष्पादित करणे बंधनकारक आहे. तसेच सदरच्या आदेशा पासून एक महिन्याच्या आत तहसिलदार साक्री यांचे कडेस (सरकारी जमिनीचे विल्हेवाट) नियम 1971 व महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-4 ब अधिसुचना क्रमांक जमीन-2015/प्र.क्र.55/ज-1 दिनांक 31/12/2015 मधील विहित नमुन्यात सनद तयार करुन देणे बंधनकारक राहील.
12) वरील पैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न देता सदर जमीन सरकार जमा करण्यात येईल.

स्वाक्षरीत xxx
**जिल्हाधिकारी धुळे**

प्रति :- प्रकल्प अधिकारी, एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प धुळे यांचे कडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- म.प्रधान सचिव,महसूल व वन विभाग (ज-6), मादाम कामा मार्ग,मंत्रालय मुंबई -32 यांना माहितीस्तव सविनय सादर
प्रत :- म. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडेस माहितीसाठी सविनय सादर
प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद धुळे यांचे कडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ धुळे यांचे कडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- उपविभागीय अधिकारी धुळे कडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- तहसिलदार धुळे यांचेकडेस मुळ प्रस्ताव पृ.क्र. 1 ते 174 सह पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
2/- प्रकल्प अधिकारी, एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प धुळे विहित मुदतीत करारनामा व सनद करण्यात येऊन दप्तरी व कब्जाहक्क नोंदवही मध्ये आवश्यक ती नोंद करण्यात येऊन आदेशातील अटी व शर्तीची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.
प्रत :- सरपंच, ग्रामपंचायत नकाणे ता.जि.धुळे यांचे कडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

**उपजिल्हाधिकारी (प्रशासन)**
**जिल्हाधिकारी धुळे करिता**

वाचले :-

1. कार्यकारी अभियंता,(स्थापत्य) स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था महावितरण जळगाव यांचे पत्र क्रमांक Tech/557 दिनांक 29/06/2015
2. उपविभागीय अधिकारी धुळे यांचे पत्र क्रमांक गावठाण/कावि-3128 दिनांक 16/10/2015
3. महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग पत्र क्रमांक जमीन-01/2008/प्र.क्र.175/ज-1 दिनांक 09 फेब्रवारी 2010
4. महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र.जमीन 03/2011/प्र.क्र.53/ज-1, दिनांक 12 जुलै 2011
5. महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग परीपत्रक क्रमांक जमीन-05/2011/प्र.क्र.90/ज-1 दिनांक 13 जुन 2013

---

क्रमांक महसूल शाखा (ब)/कक्ष-1/गावठाण/कावि-22/2016
जिल्हाधिकारी कार्यालय धुळे
धुळे, दिनांक - 16/01/2016

**आदेश**

कार्यकारी अभियंता,(स्थापत्य) स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,जळगांव यांनी उपोद्घातातील क्रमांक 1 नुसार 33/11 के.व्ही.विद्युत उपकेंद्र उभारणीसाठी मौजे वरखेडी ता.जि.धुळे येथील गट नंबर 12 चे एकुण क्षेत्र 11 हेक्टर 66 आर पैकी **60 आर** क्षेत्र मंजुर होणेस विनंती केलेली आहे.

प्रस्तुत कामी तहसिलदार धुळे यांचे मार्फत सविस्तर चौकशी करण्यात आलेली असुन, उपविभागीय अधिकारी धुळे यांचे उपोद्घातातील क्रमांक 2 चे अहवालानुसार मागणी नियोजित 33/11 के.व्ही.विद्युत उपकेंद्रासाठी महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीची विल्हेवाट लावणे) नियम 1971 मधील तरतुदीनुसार जागा मंजुर करणेस हरकत नसल्याबाबत अहवाल सादर केलेला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परीषद धुळे यांचे पत्र क्रमांक धुजिप/ग्रापं/1/3/816 दिनांक 03/10/2015 अन्वये शासन निर्णय दिनांक 12 जुलै 2011 मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सुचना तसेच शासकिय प्रकल्प असल्याने ग्रामपंचायत वरखेडी ता.जि.धुळे ग्रामसभेच्या ठरावाचा विचार होऊन पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अहवाल सादर केलेला आहे.

उपविभागीय अधिकारी, पाटबंधारे उपविभाग क्रमांक 1 धुळे यांचे पत्र क्रमांक जा.क्र.बिनशेती/1300 दिनांक 07/08/2015 अन्वये प्रस्तावित उपकेंद्राची जागा ही पाटशाखा धुळे क्रमांक 2 अंतर्गत असलेल्या कोणत्याही प्रकारच्या लाभदायक किंवा बुडीत क्षेत्रात येत नसल्याबाबत अहवाल सादर केलेला आहे.

कार्यकारी अभियंता,सा.बा.विभाग धुळे यांचे पत्र जा.क्र./सीबी/निवास/6846 दिनांक 07/09/2015 अन्वये सदर शासकिय जमीन वरखेडी आर्णी रस्ता इजिमा-52 या रस्त्यावर असुन सदरचा रस्ता हा कार्यकारी अभियंता,जि.प.धुळे यांच्या कार्यक्षेत्रात येत असल्यामुळे कार्यालयाचा अभिप्राय निरंक असल्याचा अहवाल सादर केला आहे.

सह जिल्हा निबंधक वर्ग-1 (निम्नश्रेणी) धुळे यांचे पत्र क्रमांक कक्ष-7/मुल्यांकन/2170 दिनांक 07/10/2015 अन्वये प्रस्तुत 60 आर क्षेत्राचे सन 2015 चे अकृषिक मुल्यांकन रु.9,84,000/- अक्षरी नऊ लाख चौ-यांशी हजार मात्र कळविले आहे. त्यानुसार अर्जदार संस्था यांनी तहसिलदार धुळे यांचे मार्फत दिनांक 31/12/2015 रोजी चलन क्रमांक GRN MH 00 6131430 2015 16 M द्वारे सदर रक्कम शासन जमा केलेली आहे.

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचेकडील शुध्दीपत्रक क्र.जमीन-05/ 2011/प्र.क्र.90/ज-1, दिनांक 17 ऑक्टोंबर 2011 अन्वये विद्युत पुरवठा हे सार्वजनिक प्रयोजन असल्याने महावितरण व महापारेषण कंपन्यांच्या (पूर्वीचे महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ) विद्युत उपकेंद्र व रिसिविंग स्टेशनसाठी शासकीय जमीन व गायरान जमीनीचा आगाऊ ताबा देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात येत असल्या बाबत निर्देश आहेत.

उपरोक्त विवेचनाअंती मी जिल्हाधिकारी धुळे मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन, मौजे **वरखेडी ता.जि.धुळे येथील गट नंबर 12** चे एकुण क्षेत्र 11 हेक्टर 66 आर पैकी भुकरमापक,उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय धुळे यांचे कडिल मोजणी नकाशा क्रमांक 01 दिनांक 07/09/2015 मधील मोजणी नकाश्यात लाल शाईने रेखांकित/दर्शविलेले **60 आर क्षेत्राचा** कार्यकारी अभियंता, (स्थापत्य) स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित जळगाव यांना नियोजित 33/11 के.व्ही.उपकेंद्रासाठी खालील अटी/शर्तीवर **आगाऊ ताबा** देणे बाबत आदेशित करीत आहे.

**अटी/शर्ती**

1) अर्जदार संस्था हे सदरची जमीन भोगवटादार वर्ग-2 म्हणुन धारण करतील.
2) जागेचा वापर केवळ 33/11 के.व्ही.विदयुत उपकेंद्रासाठीच करण्यात येईल.
3) याकामी शासनाने अंतिम मान्यता न दिल्यास जमीनीचा ताबा तात्काळ शासनास परत करावा लागेल व आगाऊ ताबा घेतल्यानंतर जो काही खर्च संबंधित विभागाकडून झाला आहे त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच अर्जदार संस्थेने सदर जागा कोणत्याही कारणास्तव शासनास परत केल्यास शासन जमा केलेली रक्कम परत मिळणार नाही.
4) शासनाच्या पुर्वपरवानगी शिवाय जागा हस्तांतरण / तारण ठेवता येणार नाही.
5) जागेचा नियमानुसार आवश्यक रुंदीचा पोच रस्ता असल्याची खातरजमा करण्यात यावी.
6) सदर भुखंडातुन जात असलेल्या नाल्यावर स्लॅब ड्रेनचे व सरंक्षक भिंतीचे बांधकाम करणे आवश्यक आहे.
7) सदर जमीन समतल करुन घेण्यात यावी व मंजुर आराखडयाप्रमाणे बांधकाम करण्यात यावे.
8) रस्त्याच्या मध्यापासुन 50.00 मीटर (वळण रस्त्याच्या बाबतीत 75.00 मीटर) नियंत्रण रेषेच्या आत संबंधीतास कोणतेही बांधकाम करता येणार नाही.
9) जोड रस्ता किंवा सेवा रस्त्याची आवश्यकता असल्यास कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग धुळे यांचे कडेस स्वतंत्रपणे प्रस्ताव सादर करणे बंधनकारक राहील.
10) जमीनीतील सर्व खाणी व खनीज पदार्थ तसेच पाणी या वरील शासनाने राखून ठेवलेल्या अधिकारास अधिन राहून जमीन वर्ग करण्यात येत आहे.शासनास खाणकाम व जमीनीतील द्रव्ये शोधण्याच्या प्रयोजनार्थ महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील तरतूदीनुसार त्या ठिकाणी प्रवेश करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य असेल.
11) महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग यांचे कडिल परीपत्रक क्रमांक जमीन-07/2013 प्र.क्र.374/ज-1 दिनांक 10/10/2013 नुसार शासकिय जमीनीवर अतिक्रमणास प्रतिबंध करणे ची जबाबदारी संबंधीत जमीन ज्या विभागाच्या ताब्यात आहे त्यांची आहे त्यानुसार सदर जमीनीच्या कोणत्याही क्षेत्रावर अतिक्रमण होणार नाही याबाबत कार्यकारी अभियंता,(स्थापत्य) स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित विभागीय कार्यालय जळगाव यांची जबाबदारी राहील.
12) वरील पैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न देता सदर जमीन सरकार जमा करण्यात येईल.

स्वाक्षरीत xxx
जिल्हाधिकारी धुळे

प्रति :- कार्यकारी अभियंता (स्थापत्य),स्थानिक बांधकाम व सुव्यवस्था विभाग,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित जळगाव परीमंडळ कार्यालय समोर , प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीमध्ये जुनी औद्योगिक वसाहत, अजिंठा रोड,जळगाव-425503 यांचे कडेस उक्त अटी/शर्तीनुसार अंमलबजावणी व आवश्यक कार्यवाहीसाठी

प्रत :- म.विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचे कडेस माहितीस्तव सविनय सादर

प्रत :- उपविभागीय अधिकारी, धुळे यांचेकडेस पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत :- तहसिलदार धुळे यांचेकडेस (प्रकरणाची मुळ संचिका पृ.क्र. 1 ते 17 सह)

2/- मंजूर केलेल्या जमीनीचा आगाऊ ताबा अर्जदार संस्था यांना देवून ताबे पावती व दुरुस्त उता-यासह अंतिम कब्जा हक्क आदेश होणे कामी तात्काळ उपविभागीय अधिकारी धुळे यांचे मार्फत विहित नमून्यात प्रस्ताव सादर करण्यात यावा यात विलंब होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

उपजिल्हाधिकारी (प्रशासन)
जिल्हाधिकारी धुळे करिता,

वाचले :-

1. कार्यकारी अभियंता,(स्थापत्य) स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था महावितरण जळगाव यांचे पत्र क्रमांक Tech/204 दिनांक 25/02/2013
2. उपविभागीय अधिकारी शिरपूर यांचे पत्र क्रमांक जमिन/कावि-50 दिनांक 25/02/2015
3. महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग पत्र क्रमांक जमीन-01/2008/प्र.क्र.175/ज-1 दिनांक 09 फेब्रवारी 2010
4. महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र.जमीन 03/2011/प्र.क्र.53/ज-1, दिनांक 12 जुलै 2011
5. महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग परीपत्रक क्रमांक जमीन-05/2011/प्र.क्र.90/ज-1 दिनांक 13 जुन 2013
6. इकडिल आदेश क्रमांक ब/कक्ष-1/गावठाण/कावि-571 दिनांक 30/05/2015
7. कार्यकारी अभियंता,(स्थापत्य) स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,जळगांव यांचे पत्र क्रमांक 423 दिनांक 23 मार्च 2016

---

क्रमांक महसूल शाखा (ब)/कक्ष-1/गावठाण/कावि-227/2016
जिल्हाधिकारी कार्यालय धुळे
धुळे , दिनांक - 20/05/2016

**सुधारीत आदेश**

कार्यकारी अभियंता,(स्थापत्य) स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,जळगांव यांनी उपोद्घातातील क्रमांक 1 नुसार 33/11 के.व्ही.विद्युत उपकेंद्र उभारणीसाठी मौजे बाळदे ता.शिरपूर जि.धुळे येथील गट नंबर 111/1 चे एकुण क्षेत्र 33 हेक्टर 04 आर पैकी 60 आर जमीन मंजुर होणेस विनंती केलेली होती.

तद्नंतर सह जिल्हा निबंधक वर्ग-1 (निम्नश्रेणी) धुळे यांचे पत्र क्रमांक कक्ष-7/मुल्यांकन/255 दिनांक 27/01/2015 अन्वये प्रस्तुत 60 आर क्षेत्राचे सन 2015 चे अकृषिक मुल्यांकन रु.11,76,000/- अक्षरी अकरा लाख श्याहत्तर हजार मात्र कळविले आहे. त्यानुसार अर्जदार संस्था यांनी तहसिलदार शिरपूर यांचे मार्फत सादर रक्कम दिनांक 24/04/2015 रोजी चलनाद्वारे शासन जमा केलेली आहे.

त्यानुसार पडताळणी अंती उपोद्घातातील क्रमांक 6 च्या आदेशानुसार कार्यकारी अभियंता, (स्थापत्य) स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित जळगाव यांना नियोजित 33/11 के.व्ही.उपकेंद्रासाठी मौजे बाळदे ता.शिरपूर जि.धुळे येथील **गट नंबर 111/1** चे एकुण क्षेत्र 33 हेक्टर 04 आर पैकी भुकरमापक शिरपूर यांचे कडिल मोजणी नकाशा दिनांक 03/11/2014 मधील मोजणी नकाश्यात लाल शाईने रेखांकित/दर्शविलेले **60 आर क्षेत्राचा** नमुद केलेल्या अटी/शर्तींवर **आगाऊ ताबा** देणे बाबत आदेशित पारीत करण्यात आलेला होता. त्यानुसार मंडळ अधिकारी अर्थे यांचे कडुन सदर संस्थेस दिनांक 17/06/2015 रोजीचा जागेचा आगाऊ ताबा देण्यात आलेला आहे.

तद्नंतर कार्यकारी अभियंता,(स्थापत्य) स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,जळगांव यांचे पत्र क्रमांक 423 दिनांक 23 मार्च 2016 अन्वये काही तांत्रिक बाबींमुळे (Due to excessive land deveopment expenditure/cost ) सदर जागेवर केंद्र उभारणे शक्य नसल्याने त्याच गटातील बाळदे गिधाडे रस्ता व गिधाडे शिव लगत उपकेंद्र जागा मंजुर होणेस विनंती केलेली आहे.

त्याअनुषंगाने मी जिल्हाधिकारी धुळे यापुर्वी उपोद्घातातील क्रमांक 6 च्या आदेशानुसार झालेला आगाऊ ताबा आदेश रद्द करण्यात येत असुन त्याऐवजी उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय शिरपूर यांचे कडिल मोजणी नकाशा मो.र.नं.7/2016 दिनांक 26/04/2016 मध्ये मौजे बाळदे ता.शिरपूर जि.धुळे येथील गट नंबर 111/1 मधील लाल शाईने अधारेखित/दर्शविलेले **60 आर क्षेत्र** (चतु:सिमा ** पुर्व - उर्वरीत ग.नं.111/1, पश्चिम - बाळदे गिधाडे रस्ता , दक्षिण - गिधाडे शिव नाला , उत्तर - उर्वरीत ग.नं.111/1 ) कार्यकारी अभियंता, (स्थापत्य) स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित जळगाव यांना नियोजित 33/11 के.व्ही.उपकेंद्रासाठी खालील अटी/शर्तींवर **आगाऊ ताबा** देणे बाबत आदेशित करीत आहे.

**अटी/शर्ती**

1. अर्जदार हे सदरची जमीन भोगवटदार वर्ग-2 म्हणुन धारण करतील.
2. जागेचा वापर केवळ 33/11 के.व्ही.विदयुत उपकेंद्रासाठीच करण्यात येईल.
3. याकामी शासनाने अंतिम मान्यता न दिल्यास जमीनीचा ताबा तात्काळ शासनास परत करावा लागेल व आगऊ ताबा घेतल्यानंतर जो काही खर्च संबंधित विभागाकडुन झाला आहे त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच अर्जदार संस्थेने सदर जागा कोणत्याही कारणास्तव शासनास परत केल्यास शासन जमा केलेली रक्कम परत मिळणार नाही.
4. शासनाच्या पुर्वपरवानगी शिवाय जागा हस्तांतरण / तारण ठेवता येणार नाही.
5. जागेचा 12 मीटर रुंदीचा पोच रस्ता असल्याची खातरजमा करण्यात यावी.
6. सदर भुखंडातुन जात असलेल्या नाल्यावर स्लॅब ड्रेनचे व संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे आवश्यक आहे.
7. सदर जमीन समतल करुन घेण्यात यावी व मंजुर आराखडयाप्रमाणे बांधकाम करण्यात यावे.
8. रस्त्याच्या मध्यापासुन 50.00 मीटर (वळण रस्त्याच्या बाबतीत 75.00 मीटर) नियंत्रण रेषेच्या आत संबंधीतास कोणतेही बांधकाम करता येणार नाही.
9. जोड रस्ता किंवा सेवा रस्त्याची आवश्यकता असल्यास कार्यकारी अभियंता (रो.ह.यो.) सार्वजनिक बांधकाम विभाग धुळे यांचे कडेस स्वतंत्रपणे प्रस्ताव सादर करणे बंधनकारक राहील.
10. जमीनीतील सर्व खाणी व खनीज पदार्थ तसेच पाणी या वरील शासनाने राखून ठेवलेल्या अधिकारास अधिन राहून जमीन वर्ग करण्यात येत आहे. आणि शासनास खाणकाम व जमीनीतील द्रव्ये शोधण्याच्या प्रयोजनार्थ महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील तरतूदीनुसार त्या ठिकाणी प्रवेश करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य असेल.
11. महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग यांचे कडिल परीपत्रक क्रमांक जमीन-07/2013 प्र.क्र.374/ज-1 दिनांक 10/10/2013 नुसार शासकिय जमीनीवर अतिक्रमणास प्रतिबंध करणे ची जबाबदारी संबंधीत जमीन ज्या विभागाच्या ताब्यात आहे त्यांची आहे त्यानुसार सदर जमीनीच्या कोणत्याही क्षेत्रावर अतिक्रमण होणार नाही याबावत कार्यकारी अभियंता,(स्थापत्य) स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित विभागीय कार्यालय जळगाव यांची जबाबदारी राहील.
12. वरील पैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न देता सदर जमीन सरकार जमा करण्यात येईल.

स्वाक्षरीत xxx
(अणासाहेब मिसाळ)
जिल्हाधिकारी धुळे

प्रति :- कार्यकारी अभियंता, ( स्थापत्य ) स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित विभागीय कार्यालय,जळगांव पी-3 प्रशासकिय इमारत,जुनी एम.आ.डि.सी.अंजिठा रोड जळगाव यांचे कडेस आदेशातील अटी/शर्तीनुसार अंमलबजावणी कामी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

प्रत :- म.विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचे कडेस माहितीस्तव सविनय सादर
प्रत :- उपविभागीय अधिकारी, शिरपूर यांचेकडेस पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत :- तहसिलदार शिरपूर यांचेकडेस (प्रकरणाची मुळ संचिका पृ.क्र. 1 ते 19 सह )

2/- मंजूर केलेल्या जमीनीचा आगाऊ ताबा कार्यकारी अभियंता, (स्थापत्य) स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित जळगाव यांना देवून ताबे पावती व दुरुस्त उता-यासह अंतिम कब्जा हक्क आदेश होणे कामी तात्काळ उपविभागीय अधिकारी शिरपूर यांचे मार्फत विहित नमून्यात प्रस्ताव सादर करण्यात यावा यात विलंब होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

उपजिल्हाधिकारी (महसूल प्रशासन)
जिल्हाधिकारी धुळे करिता.

वाचले :-

1. जिल्हा शल्यचिकित्सक धुळे यांचे पत्र क्रमांक जिरुध/नियोजन/बांधकाम/2954-55 दिनांक 02/04/2013
2. उपविभागीय अधिकारी धुळे यांचे पत्र क्रमांक गावठाण/कावि-334,335 दिनांक 08/03/2016
3. महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग पत्र क्रमांक जमीन-01/2008/प्र.क्र.175/ज-1 दिनांक 09 फेब्रवारी 2010
4. महाराष्ट्र शासन,सार्वजनिक आरोग्य विभाग.शा.नि.क्र.संकिर्ण-2012/प्र.क्र.141/आरोग्य -3 दिनांक 17 जानेवारी 2013
5. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-4 व अधिसुचना क्रमांक जमीन-2015/प्र.क्र.55/ज-1 दिनांक 31/12/2015

---

क्रमांक महसूल शाखा (ब)/कक्ष-1/गावठाण/कावि-158/2016
जिल्हाधिकारी कार्यालय धुळे
धुळे , दिनांक - 21/03/2016

**आदेश**

ज्या अर्थी,जिल्हा शल्यचिकित्सक धुळे यांचे उपोदघातील क्रमांक 1 च्या पत्रान्वये ग्रामीण रुग्णालय लामकानी इमारत व कर्मचारी निवासस्थानासाठी शासकिय जागा मंजुर होणेस विनंती केलेली आहे.

त्याअनुषंगाने प्रकरणाची तहसिलदार धुळे यांचे मार्फत सविस्तर चौकशी करण्यात आलेली असुन, उपविभागीय अधिकारी धुळे यांचे पत्र क्रमांक गावठाण/कावि-334,335 दिनांक 08/03/2016 अन्वये ग्रामीण रुग्णालय लामकानी इमारती साठी गट नंबर 645 (मातीखाण) मधील 1 हेक्टर 19 आर क्षेत्र व कर्मचारी निवासस्थानासाठी लामकानी गट नंबर 632 (सरकारी गाववर्दळ) मधील 57 आर क्षेत्र मंजुरी बाबत प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2012/प्र.क्र.141/आरोग्य -3 दिनांक 17 जानेवारी 2013 अन्वये मौजे लामकानी ता.जि.धुळे येथे 30 खाटांचे ग्रामीण रुग्णालय स्थापन करण्यास प्रशासकिय मान्यता दिलेली आहे.

कार्यकारी अभियंता, सा.बा.विभाग धुळे यांचे पत्र क्रमांक जा.क्र.रेशा/1720 दिनांक 01/03/2016 अन्वये जागा प्राप्त झाल्यावर उपमुख्य वास्तु शास्त्रज्ञ, सा.बा.प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांचे कडुन नियोजित प्रकल्पाचा वास्तुमांडणी आराखडा (लेआऊट) तयार करुन घेणे बाबत तसेच अद्ययावत नकाशाप्रमाणे चालु दरवर्षी वर अंदाजपत्रक प्रशासकिय मान्यतेसाठी सादर करण्यात येईल असा अहवाल सादर केलेला आहे.

ग्रामपंचायत लामकानी येथील ग्रामसभा ठराव क्रमांक 6/1 दिनांक 26/03/2015 अन्वये ग्रामीण रुग्णालय व कर्मचारी निवासस्थान साठी मौजे लामकानी येथील गट नंबर 645 व गट नंबर 632 मधील क्षेत्र मंजुर करणेस हरकत नसल्याबाबत ठराव पारीत केलेला आहे.त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.धुळे यांचे पत्र क्रमांक ग्राप/1/3/783 दिनांक 19/09/2015 अन्वये सदर जागा मंजुर करण्यात हकरत नसल्याबाबत शिफारस केलेली आहे.

कार्यकारी अभियंता, सा.बा.विभाग धुळे यांचे पत्र क्रमांक जा.क्र.रेशा/1720 दिनांक 01/03/2016 अन्वये पथकिनारवर्ती नियमानुसार (Ribon Development Control Rules) सदर जागा बांधकाम योग्य असल्याबाबत अहवाल सादर केलेला आहे.

कार्यकारी अभियंता, धुळे पाटबंधारे विभाग धुळे यांचे पत्र क्रमांक पशा/भूसं/1148 दिनांक 18/02/2016 अन्वये मौजे लामकानी ता.जि.धुळे येथील गट नंबर 645 व 632 मधील क्षेत्र पाटशाखा, सोनगीर अंतर्गत असलेल्या लामकानी लघु प्रकल्पाच्या लाभदायक क्षेत्रात / बुडीतक्षेत्रात येत नसल्याबाबत अहवाल सादर केलेला आहे.

सह जिल्हा निबंधक वर्ग-1 (निम्नश्रेणी) धुळे यांचे पत्र क्रमांक 327 दिनांक 06/02/2016 अन्वये मौजे लामकानी येथील गट नंबर 645 मधील क्षेत्र 1 हेक्टर 19 आर चे सन 2015 चे अकृषिक मुल्यांकन रु.25,47,200/- व गट नंबर 632 मधील क्षेत्र 57 आर चे सन 2015 चे अकृषिक मुल्यांकन रु.14,78,400/- असे नमुद केलेले आहे.

महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग यांचे कडिल शासन निर्णय क्रमांक जमीन-05/2011/प्र.क्र.90/ज-1 दिनांक 27 जुलै 2011 नुसार शासकिय आश्रमशाळा इत्यादी शासकिय प्रयोजनासाठी जमिनींच्या किमान गरजेनुसार (Bonafide area requirement) जिल्हाधिकारी यांना 1 हेक्टर पर्यंत क्षेत्राचा आगाऊ ताबा देण्याचे अधिकार आहेत. परंतु म.उपसचिव, महसूल व वनविभाग यांचे पत्र क्रमांक जमीन-2015/प्र.क्र.55/ज-1 दिनांक 5 जानेवारी 2016 समवेत महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-4 व अधिसुचना मधील , कलम 3 (ब) नुसार , ज्या ठिकाणी राज्य शासनाने रितसर मान्यता प्रदान केलेल्या शासकिय प्रकल्पांकरीता शासकिय जमीन आवश्यक असले, तेथे अशा जमिनीचे भोगवटामूल्य कितीही असेल तरी, जिल्हाधिकारी अशी जमीन राज्य शासनाच्या संबंधित विभागास महसूलमुक्त व सारामाफीने प्रदान करण्यास सक्षम राहतील, असे नमुद केलेले आहे.

त्याअर्थी, मी जिल्हाधिकारी धुळे मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 च्या नियम 51 (1) (अ) नुसार सदर क्षेत्र ग्रामपंचायती कडुन काढुन घेऊन महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 चा नियम 22 अन्वये सरकारी पडितात दाखल करुन महाराष्ट्र महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीची विल्हेवाट लावणे) नियम 1971 चा नियम 5 व 6 अन्वये प्रस्तुत प्रकरणी जिल्हा शल्यचिकित्सक धुळे यांना मौजे लामकानी ता.जि.धुळे येथील खालील प्रमाणे क्षेत्र महसूलमुक्त व सारामाफीने प्रदान/मंजुर करीत आहे.

| अ.क्र. | गट नंबर | प्रयोजन | मंजुर क्षेत्र |
|---|---|---|---|
| 1 | **गट नंबर 645** (मातीखाण) | ग्रामीण रुग्णालय | उप अधीक्षक भुमि अभिलेख धुळे यांचे कडिल मोजणी नकाशा क्रमांक अतितातडी/मो.र.क्र.06/15 दिनांक 07/11/2015 मध्ये लाल शाईने रेखांकित केलेले **01 हेक्टर 19 आर क्षेत्र** |
| 2 | **गट नंबर 632** (सरकारी गावठाण) | कर्मचारी निवासस्थान | उप अधीक्षक भुमि अभिलेख धुळे यांचे कडिल मोजणी नकाशा क्रमांक अतितातडी/मो.र.क्र.05/15 दिनांक 07/11/2015 मध्ये लाल शाईने रेखांकित केलेले **57 आर क्षेत्र** |

**अटी/शर्ती**

1) जिल्हा शल्यचिकित्सक धुळे हे सदर मंजुर क्षेत्र **भोगवटदार वर्ग** 2 म्हणुन धारण करतील.
2) सदर जमीनीचा मंजुर प्रयोजनार्थ अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी वापर करता येणार नाही.
3) सदर जमीन किंवा जमीनीचा कोणताही भाग विक्री, हस्तांतरण करता येणार नाही किंवा तारण ठेवता येणार नाही.
4) मंजुर क्षेत्रास नियमानुसार आवश्यक रुंदीचा पोच रस्ता आवश्यक आहे
5) मंजुर क्षेत्रातुन नाला जात असल्यास त्यावर स्लॅब ड्रेनचे बांधकाम करणे आवश्यक आहे.
6) मंजुर क्षेत्रावर शासन नियम/निर्णयानुसार मंजुर केलेल्या आराखडयाप्रमाणे बांधकाम करण्यात यावे.
7) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 व शासन नियमातील तरतुदीनुसार मंजुर क्षेत्रातील सर्व खनीज/द्रव्य पदार्थ तसेच पाणी या वरील शासनाने राखून ठेवलेल्या अधिकारास अधिन राहून जमीन मंजुर करण्यात येत आहे.
8) महाराष्ट्र शासन,महसुल व वनविभाग,परीपत्रक क्रमांक जमीन-07/2013 प्र.क्र.374/ज-1 दिनांक 10/10/2013 नुसार मंजुर क्षेत्रावर अतिक्रमण होणार नाही याबाबत जिल्हा शल्यचिकित्सक धुळे यांची जबाबदारी राहील.
9) महाराष्ट्र शासन,महसुल व वनविभाग,परीपत्रक क्रमांक जमीन-05/2007/प्र.क्र.32/ज-1 दिनांक 28/06/2007 नुसार मंजुर करण्यात आलेल्या क्षेत्राच्या किमान 10 % क्षेत्रावर वृक्ष लागवड करुन त्यांची जोपासना करणे बंधनकारक राहील.
10) सदरच्या आदेशा पासून 01 महिन्याच्या (सरकारी जमिनीचे विल्हेवाट) नियम 1971 व महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-4 ब अधिसुचना क्रमांक जमीन-2015/प्र.क्र.55/ज-1 दिनांक 31/12/2015 मधील विहित नमुन्यात सनद तयार करुन देणे बंधनकारक राहील.
11) शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-05/2006/प्र.क्र.43/ज-1, दिनांक 31 ऑक्टोंबर 2006 अन्वये शासकीय जमीनी कब्जेहक्काने देतांना करावयाचा करारनामा दस्त मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 नुसार निष्पादित करणे बंधनकारक आहे.
12) वरील पैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न देता सदर जमीन सरकार जमा करण्यात येईल.

स्वाक्षरीत xxx
**जिल्हाधिकारी धुळे**

प्रति :- जिल्हा शल्यचिकित्सक धुळे यांचे कडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- **म.प्रधान** सचिव,महसूल व वन विभाग (ज-6), मादाम कामा मार्ग,मंत्रालय मुंबई -32 यांना माहितीस्तव सविनय सादर
प्रत :- म. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडेस माहितीसाठी सविनय सादर
प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद धुळे यांचे कडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ धुळे यांचे कडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- उपविभागीय अधिकारी धुळे कडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- तहसिलदार धुळे यांचेकडेस मुळ प्रस्ताव पृ.क्र. 01 ते 85 सह पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

2/- जिल्हा शल्यचिकित्सक धुळे यांना सदर मंजुर क्षेत्राचा ताबा प्रदान करण्यात येऊन त्यांचे कडुन विहित मुदतीत सनद व करारनामा करण्यात येऊन दप्तरी व कब्जाहक्क नोंदवही मध्ये नोंद करण्यात करण्यात यावी. तसेच, आदेशातील अटी व शर्तीची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

**उपजिल्हाधिकारी (महसूल प्रशासन)**
**जिल्हाधिकारी धुळे करिता**

वाचले –

1) श्रीमती प्रतिभा ज्ञानेश्वर पाटील, रा.धावडे ता.शिंदखेडा जि.धुळे यांचा अर्ज दिनांक 13/04/2016
2) महसूल व वनविभाग यांचे कडिल शासन निर्णय क्रमांक जमीन-03/2011/प्र.क्र.53/ज-1 दिनांक 12 जुलै 2011
3) म.कक्ष अधिकारी, महसूल व वनविभाग यांचे पत्र क्रमांक जमीन-3116/प्र.क्र.152/ज-6 दिनांक 8 मार्च 2016

---

क्रमांक महसूल शाखा (ब)/कक्ष-1/गावठाण/कावि-186/2016
जिल्हाधिकारी कार्यालय धुळे
धुळे , दिनांक - 25/04/2016

**आदेश,**

श्रीमती प्रतिभा ज्ञानेश्वर पाटील, रा.धावडे, ता.शिंदखेडा, जि.धुळे यांनी त्यांचा अर्ज दिनांक 13/04/2016 अन्वये मौजे धावडे ता.शिंदखेडा जि.धुळे येथील शासकिय गट नंबर 209 मधील 8 हेक्टर 18 आर क्षेत्र उद्योग उभारणी या अकृषिक प्रयोजनासाठी मंजुर होणेस विनंती केलेली आहे.

महसूल व वनविभाग यांचे शासन निर्णय क्रमांक जमीन-03/2011/प्र.क्र.53/ज-1 दिनांक 12 जुलै 2011 मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुषंगाने शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला असल्याचे नमुद केले आहे.

मुद्दा क्रमांक 09 (1) - यापुढे गायरान जमीन अथवा सार्वजनिक जमीन फक्त केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणा-या सार्वजनिक सुविधा (Public Utility) व सार्वजनिक प्रयोजन (Public Purpose) यासाठी अन्य जमीन उपलब्ध नसल्यास याबाबत विचार करावा.

मुद्दा क्रमांक 09 (2) - गायरान/गुरचरण अथवा गावक-यांच्या सार्वजनिक वापरातील जमीन कोणतीही व्यक्ती,खाजगी संस्था,संघटना यांना कोणत्याही प्रयोजनासाठी मंजुर करण्यात येऊ नये.

म.कक्ष अधिकारी, महसूल व वनविभाग यांचे पत्र क्रमांक जमीन-3116/प्र.क्र.152/ज-6 दिनांक 8 मार्च 2016 अन्वये " जेव्हा केव्हा व्यक्ती, खाजगी संस्था, संघटना गायरान/गुरचरण अथवा गावक-यांच्या सार्वजनिक वापराच्या जागांची मागणी करतील,तेव्हा नमुद दिनांक 12 जुलै 2011 च्या शासन निर्णयातील परिच्छेद 9 (2) प्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे ," असे निर्देशित केलेले आहे.

उक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने श्रीमती प्रतिभा ज्ञानेश्वर पाटील, रा.धावडे, ता.शिंदखेडा, जि.धुळे यांचा मौजे धावडे ता.शिंदखेडा जि.धुळे येथील शासकिय गट नंबर 209 मधील 8 हेक्टर 18 आर क्षेत्र उद्योग उभारणी या अकृषिक प्रयोजनासाठी जागा मागणीचा दिनांक 13/04/2016 रोजीचा अर्ज सदर आदेशाद्वारे निकाली काढण्यात येत आहे.

स्वाक्षरीत xxx
(अण्णासाहेब मिसाळ)
जिल्हाधिकारी धुळे

प्रति,

श्रीमती प्रतिभा ज्ञानेश्वर पाटील, रा.धावडे, ता.शिंदखेडा, जि.धुळे यांना माहितीसाठी

प्रत - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद धुळे यांचे कडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत - उपविभागीय अधिकारी शिरपूर यांचे कडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत - तहसिलदार शिंदखेडा यांचे कडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत - सरपंच, ग्रामपंचायत धावडे ता.शिंदखेडा जि.धुळे यांचेकडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

उपजिल्हाधिकारी (महसूल प्रशासन)
जिल्हाधिकारी धुळे करिता

वाचले –

1) श्री.युवराज विठ्ठल पाटील, रा.धावडे ता.शिंदखेडा जि.धुळे यांचा अर्ज दिनांक 13/04/2016
2) महसूल व वनविभाग यांचे कडिल शासन निर्णय क्रमांक जमीन-03/2011/प्र.क्र.53/ज-1 दिनांक 12 जुलै 2011
3) म.कक्ष अधिकारी, महसूल व वनविभाग यांचे पत्र क्रमांक जमीन-3116/प्र.क्र.152/ज-6 दिनांक 8 मार्च 2016

---

क्रमांक महसूल शाखा (ब)/कक्ष-1/गावठाण/कावि-187/2016
जिल्हाधिकारी कार्यालय धुळे
धुळे, दिनांक - 25/04/2016

**आदेश,**

श्री.युवराज विठ्ठल पाटील, रा.धावडे ता.शिंदखेडा जि.धुळे यांनी त्यांचा अर्ज दिनांक 13/04/2016 अन्वये मौजे धावडे ता.शिंदखेडा जि.धुळे येथील शासकिय गट नंबर 93 मधील 2 हेक्टर 93 आर क्षेत्र पैकी 2 हेक्टर क्षेत्र उद्योग उभारणी या अकृषिक प्रयोजनासाठी मंजुर होणेस विनंती केलेली आहे.

महसूल व वनविभाग यांचे कडिल शासन निर्णय क्रमांक जमीन-03/2011/प्र.क्र.53/ज-1 दिनांक 12 जुलै 2011 मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुषंगाने शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला असल्याचे नमुद केले आहे.

मुद्दा क्रमांक 09 (1) - यापुढे गायरान जमीन अथवा सार्वजनिक जमीन फक्त केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणा-या सार्वजनिक सुविधा (Public Utility) व सार्वजनिक प्रयोजन (Public Purpose) यासाठी अन्य जमीन उपलब्ध नसल्यास याबाबत विचार करावा.

मुद्दा क्रमांक 09 (2) - गायरान/गुरचरण अथवा गावक-यांच्या सार्वजनिक वापरातील जमीन कोणतीही व्यक्ती,खाजगी संस्था,संघटना यांना कोणत्याही प्रयोजनासाठी मंजुर करण्यात येऊ नये.

म.कक्ष अधिकारी, महसूल व वनविभाग यांचे पत्र क्रमांक जमीन-3116/प्र.क्र.152/ज-6 दिनांक 8 मार्च 2016 अन्वये " जेव्हा केव्हा व्यक्ती, खाजगी संस्था, संघटना गायरान/गुरचरण अथवा गावक-यांच्या सार्वजनिक वापराच्या जागांची मागणी करतील, तेव्हा दिनांक 12 जुलै 2011 च्या शासन निर्णयातील परिच्छेद 9 (2) प्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे ," असे निर्देशित केलेले आहे.

उक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने श्री.युवराज विठ्ठल पाटील,रा.धावडे, ता.शिंदखेडा, जि.धुळे यांचा मौजे धावडे ता.शिंदखेडा जि.धुळे येथील शासकिय गट नंबर 93 मधील 2 हेक्टर 93 आर क्षेत्र पैकी 2 हेक्टर क्षेत्र उद्योग उभारणी या अकृषिक प्रयोजनासाठी जागा मागणीचा दिनांक 13/04/2016 रोजीचा अर्ज सदर आदेशाद्वारे निकाली काढण्यात येत आहे.

स्वाक्षरीत xxx
(अण्णासाहेब मिसाळ)
जिल्हाधिकारी धुळे

प्रति,

श्री.युवराज विठ्ठल पाटील, रा.धावडे ता.शिंदखेडा जि.धुळे यांना माहितीसाठी

प्रत - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद धुळे यांचे कडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत - उपविभागीय अधिकारी शिरपूर यांचे कडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत - तहसिलदार शिंदखेडा यांचे कडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत - सरपंच, ग्रामपंचायत धावडे ता.शिंदखेडा जि.धुळे यांचेकडेस आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

उपजिल्हाधिकारी (महसूल प्रशासन)
जिल्हाधिकारी धुळे करिता